ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

31

# ग्रामिण विकासाचे प्रारुप : राष्ट्रीय गोकुळ मिशन

**डॉ.डी.एन.जिगे,**
अर्थशास्त्र विभागप्रमुख,
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

**संशोधन विषयाची निवड-**

भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये ग्रामिण विकासाचे महत्व लक्षात घेवून शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी स्वांतत्र्यानंतर अनेक योजना सुरु केल्या आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन राष्ट्रीय गोकुळ मिशन कार्यक्रम १२ व्या योजनेअंतर्गत राबविला जात आहे.

भारतात हा कार्यक्रम कशा पद्धतीने राबविला जात आहे. त्याचा ग्रामिण अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या सकारात्मक परिणामाचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये –**

१. राष्ट्रीय गोकुळ मिशनचा सखोल अभ्यास करणे.
२. राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत महिला, शेती व शेतकरी यांच्या उत्पन्न व रोजगारावर होणाऱ्या परिणामाचा शोध घेणे.
३. राष्ट्रीय गोकुळ मिशन कार्यक्रमाची एकुणच परिणामकारकता तपासणे.

**संशोधनाची गृहितके –**

१. राष्ट्रीय गोकुळ मिशन अतंर्गत शेती व शेतकऱ्यांचा विकास करता येईल.
२. राष्ट्रीय गोकुळ मिशन मुळे सीमांत शेतकऱ्यांना, महिलांना त्यांच्या स्वतःच्या शेतावर कायमस्वरुपी रोजगार निर्माण होतो.
३. राष्ट्रीय गोकुळ मिशनमुळे शेतकऱ्यांना सेंद्रीय शेती करता येते. व या जमिनीतुन कमी खर्चात आधिक उत्पादन घेता येते.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत संशोधन दुय्यम आधार सामग्रीवर आधारित आहे. विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. टक्केवारी, सरासरी सांख्यिकिय साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**तथ्यसंकलन :**

राष्ट्रीय गोकुळ मिशनचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम आधार सामग्री प्रामुख्याने पशुपालन, डेअरी आणि मत्स्यपालन विभाग, कृषी मंत्रालय, भारत सरकार याशिवाय कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, शासनाचे विविध वार्षिक अहवाल, भारताची आर्थिक पाहणी २०१७-२०१८ विविध, शासकीय प्रकाशने, नियतकालिके, विषयाशी संबधीत संदर्भग्रंथ, संशोधनात्मक लेख, शोध प्रबंध, संगणकीय संकेत स्थळे आदींचा प्रामुख्याने करण्यात आलेला आहे.

भारतात वेगवेगळी राज्य आपआपले दुध उत्पादन वाढविण्यासाठी आपल्या पातळीवर प्रयत्न करत आहेत. त्याला आधिक गती देण्यासाठी दुधउत्पादन व दुधउत्पादकता वाढीसाठी हा महत्त्वकांक्षी बहुआयामी कार्यक्रम वेगवेगळ्या राज्यांच्या सहकार्याने केंद्रसरकारने सुरु केलेला आहे. या कार्यक्रमाअंतर्गत प्रामुख्याने, देशीगार्यीचे संरक्षण व विकास करणे, त्यांच्यात अनुवंशीक सुधारणा करणे, नैसर्गीक सेवांसाठी उच्च दर्जाची अनुवंशीक योग्यता व रोगमुक्त नर तयार करणे. यासाठी गोकुळ ग्राम, कामधेनु सोसायटी, गोपालन संघ, कृत्रिम गर्भधारणा केंद्र, दुध देणाऱ्या जणावारांचे पंजीकरण करणे, जनावरांचे नकुल स्वास्थ पत्र तयार करणे इत्यादी संस्थात्मक उभारणी केली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी लागणारे कुशल अकुशल मनुष्यबळ प्रशिक्षणातुन तयार करणे आणि यातुन ग्रामिण विकासाला चालना देणे. या प्रमुख उद्दिष्ट पुर्तीसाठी हा कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. यासाठी वेगवेगळ्या विभागांची मदत घेतली जाणार आहे. या कार्यक्रमाची उद्दिष्टपूर्ती २०१६-२०२० या कालावधीमध्ये अपेक्षीत आहे. कृषी विद्यापीठ, कृषी महाविद्यालय, गैरसंस्थात्मक संस्था, सहकारी संस्था यांच्या सहभागातुन सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) अंतर्गत हा कार्यक्रम भारतभर राबविण्यात येत आहे.

एकूणच हा कार्यक्रम शेती, शेतकरी आणि ग्रामिण अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकनातुन अत्यंत महत्वाचा आहे. म्हणुन या कार्यक्रमाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शेती उत्पन्न, शेतकरी, पहिलांच्या उत्पन्न रोजगारावर होणारा सकारात्मक परिणाम पाहणे आवश्यक आहे.

भारतातील २०१२ च्या १९ व्या पशुगणनेनुसार ३०० मिलियन पशुधन असुन ही संख्या जगातील पशुधनामध्ये १८ टक्के आहे. भारतामध्ये १०८.७

मिलिअन म्हशी आणि १९०.९ मिलियन गार्यीची संख्या आहे. गार्यीच्या संख्येमध्ये २० टक्के संकरीत गायी तर ८० टक्के देशी गायी आहेत. एकूण पशुधनामध्ये केवळ ८८ मिलियन (२९.३३ टक्के) दुध देणारी पशुची संख्या आहे. यातही सर्वसाधारणपणे ५६ टक्के दुध देणाऱ्या पशुची उत्पादकता निम्न आहे. तर ८४ मिलियन (२८ टक्के) नर आहेत. उर्वरित १२८ मिलियन (४२.६७ टक्के) पशु अनुउत्पादक आहे. या कमी उत्पादकता व अनुउत्पादक पशुची उत्पादकता वाढविण्यासाठी या कार्यक्रमात वैज्ञानिक पद्धतीने जाणीवपुर्वक प्रयत्न केले जाणार आहे.

कृषिप्रधान भारतासाठी देशी गायी आज ही उपयुक्त आहे. भारतीय गोवंशासंबंधी 'अॅग्रोवन' मधुन प्रसिद्ध झालेल्या लेखमालिकेवर सकाळ प्रकाशन तर्फे तयार करण्यात आलेल्या 'देशी गोवंश' या पुस्तक प्रकाशन वेळी जेष्ट शास्त्रज्ञ डॉ.विजय भटकर यांनी दिलेल्या माहितीनुसार स्वतः डॉ.विजय भटकर देशी गार्यींचा अभ्यास करत असुन आय.आय.टी.मधील पाच कृती गटातील जवळपास १०० वैज्ञानिक सध्या देशी गाय आणि शेती, आरोग्य व विज्ञाव यावर संशोधन करत आहे. भविष्यात देशी गायीच्या दुधासह पंचगव्यावरील संशोधनाचे निष्कर्ष क्रांतीकारी स्वरुपाचे असतील असे डॉ.विजय भटकर म्हणाले.

थोडक्यात सध्या देशात रासायनिक घटकयुक्त अन्नधान्य व दुधाचा वापर होत असुन कृषिप्रधान भारतात शेतकऱ्यांच्या समस्यांवर देशी गाय हा एक चांगला उपाय आहे. भारतीय संस्कृतीत गायीला महत्व आहे. कारण गायीत विज्ञान, अध्यात्म आणि धर्म आहे. म्हणुन येणाऱ्या काळात गोसंवर्धनाचे महत्व एकात्मिक पद्धतीने समजावुन घेण्याची आवश्यकता आहे.

भारत पशुधनाबाबत जैवविविधता संपन्न देश आहे. महत्वाचे म्हणजे प्रतिकुल परिस्थितीत देखील दुधउत्पादनाची नैसर्गीक क्षमता असणाऱ्या देशी गार्यीची संख्या मोठी आहे. म्हणूनच भारताने २०१५-१६ या वर्षात जगातील एकुण दुधउत्पादनापैकी १९ टक्के दुधउत्पादन केले आहे.आज आपण १५५.४८ मिलियन टन वार्षिक दुधउत्पादनासह जागतीक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर आहोत.या कार्यक्रमाअंतर्गत भारतातील उपलब्ध गायी-म्हशींचा जवळपास शंभर वर्षाचा इतिहास अभ्यासला आहे. गायी-म्हशींचा उपयुक्तता, दुधउत्पादकता, उष्ण वातावरण सहन करण्याची आधिक क्षमता, आहारातील सर्वसमावेशकता, आधिक रोगप्रतिकार शक्ती इत्यादी महत्वाचे लक्षणे विचारात घेवुन ४० देशी गायीच्या जाती आणि १३ म्हशींच्या जातींची निवड करण्यात आली आहे.

भविष्यकाळात तापमान वृद्धी निश्चित आहे. एका अभ्यासानुसार २०२० मधील तापमान वृद्धीमुळे गाय व म्हैस यांच्या दुधउत्पादनातील वार्षिक घट ३.२ मिलियन टन इतकी मोठी असणार आहे. या दुध उत्पादन घटीची किंमत चालू किंमतीनुसार जवळपास ५००० कोटी रुपये पेक्षा अधिक असेल असा एक अंदाज आहे. म्हणुन येत्या काळात देशी गायी- म्हशींना अपेक्षित उधउत्पादनासाठी संरक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे.

वर्तमान काळात मानवी आरोग्य आणि आहारासंबंधीचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. विषयुक्त अन्न ही जागतीक मानवाची गरज आणि मागणी आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) अभ्यासानुसार संकरीत गायी-म्हशींच्या दुधामध्ये बीटा केसीन A1 आधिक असतो. यामुळे मानवाला पंचनसंस्थेसंबंधी अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. दुध देणाऱ्या पशुच्या अभ्यासातुन, प्राण्याचे साथीचे रोग, A1बीटा केसीन दुध आणि मानवाचे जुनाट आजार धनसहसंबंध आढळून आला आहे. सध्या सामाजिक आरोग्य आणि व्यावसायिकता हा जागतिक मुद्दा बनला आहे. तुलनेने गायीच्या दुधात बीटा केसीन A2 आधिक असतो. जो मानवी शरीराला कमी हानीकारक आहे. देशी गार्यीच्या दुधात ८७ टक्के पाणी आणि १३ टक्के घनपदार्थ म्हणजेच मेद, शर्करा, खनिजे, प्रथिने असतात. गायीच्या दुधात केसीन हा प्रथिनांचा मुख्य घटक असतो. आणि या केसीन पैकी ३०-३५ टक्के प्रमाण बीटा केसीन A2 चे असते.

थोडक्यात जागतिक तापमानातील बदल व मानवी आरोग्याचे प्रश्न लक्षात घेवून केंद्रसरकारने गोकुळ मिशन कार्यक्रम सुरु केला आहे.भारतासह जगभर दुध व दुधजन्य पदार्थांचा वापर अन्न पदार्थ म्हणुन केला जातो. मानव फार पुर्वीपासुन दुधाचे सेवन करत आला आहे. भारतात गायीचे दुध हे पोषक मानले जाते. त्याला समाजमान्यता व विज्ञानमान्यता आहे. पशुधन क्षेत्र केवळ रोजगार व उत्पन्न मिळुन देणारे क्षेत्र असा संकुचित विचार करुन चालणार नाही. तर यातुन भारताची उच्च उष्मांकयुक्त सामाजिक अन्न सुरक्षा निर्माण होऊ शकते. भारतातील ग्रामिण भागातील सामाजिक -आर्थिक परिस्थितीचा विचार करता कुपोषण, दारिद्र्याचा प्रश्न गंभीर आहे. या कार्यक्रमाअंतर्गत दुध उत्पादन वाढुन दुध हे पुर्ण अन्न गरीबांना पुरेशाप्रमानात मिळू शकते. यातुन भारतातील कुपोषण आणि दारिद्र्याचा प्रश्न कमी होऊ शकतो. अर्थात या कार्यक्रमाअंतर्गत दुध पर्याप्त प्रमाणात उत्पादित झाल्यास हा कार्यक्रम दारिद्र्य निर्मुलनाचा एक महत्वाचा भाग ठरु शकतो.

भारतीय अर्थव्यवस्था शेतीप्रधान व ग्रामीण अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. आपल्या सामाजिक-आर्थिक विकासात शेती क्षेत्राचे महत्वाचे योगदान आहे. शेती हा भारताच्या सामाजिक -आर्थिक विकासाचा प्रमुख निर्धारक घटक आहे. विशेषतः आपले शेती उत्पादन

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

श्रमप्रधान आहे. भारताचा शेतकरी व शेतमजुर हा ग्रामिण समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. परंतू हाच शेतकरी आज संकटात आहे. शेतजमीनीचा लहान आकार ही भारतीय शेतीपुढील एक प्रमुख समस्या आहे. तसेच कर्जबाजारीपणा, छुपी बेकारी, अल्पउत्पादकता, अल्पउत्पन्न, वाढता उत्पादन खर्च, निकृष्ट राहणीमान, स्त्री-पुरुष उत्पन्न व रोजगारातील भिन्नता,मुलांचे शिक्षण, कौटूंबिक आरोग्य, इत्यादी प्रमुख भारतीय शेतमजुर विशेषतः शेतकऱ्यांसमोर आहेत. या संकटातुन शेतकऱ्यांना बाहेर काढुन सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करुन देणे ही शासन व समाजाची मुख्य जबाबदारी आहे. याचाच एक व्यावहारिक उपाय म्हणून भारत सरकारने राज्यांच्या मदतीने राष्ट्रीय गोकुळ मिशन सुरु केले आहे. याच दृष्टिकोनातुन समाज व राज्यांनी या कार्यक्रमाकडे पाहणे आवश्यक आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत ग्रामिण भागासह शहर व महानगरातील जनावारांचा देखील विचार करण्यात आला आहे. सध्या शहरी भागात मोकाट जनावारांचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. जवळपास १००० जनावरे राहु शकतील, एवढी क्षमता असलेले गोकुळग्राम उभे केले जाणार आहे. यामध्ये प्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडुन आधुनिक पद्धतीने दुग्धव्यवसाय कसा करावा याचे उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्याचे नियोजण सरकारचे आहे. विशेषतः या गोकुळ ग्राममध्ये दुध देणाऱ्या गायी-म्हशी सोबत भाकड जनावरे यांचा देखील समावेश केला जाणार आहे. उत्पादक व अनुउत्पादक जनावरांचे गुणोत्तर ६०:४० ठेवले जाणार आहे. यातुन भाकडजनावरांचा प्रश्न सुटू शकतो. नव्हे ही भाकडजनावरे आर्थिक दृष्ट्या सांभाळणे शक्य होणार आहे. जनावरांच्या मलमुत्रापासुन सेंद्रीय खताची निर्मिती आधुनिक पद्धतीने केली जाणार आहे. उत्पादित सेंद्रीय खताचा उपयोग शेतीचा पोत व उत्पादकता वाढीसाठी केला जाणार आहे. यातुन शेतीचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादकता वाढविण्यासाठी मदत होणार आहे. यापुढे यातुन जर आपण सेंद्रीय अन्नधान्य उत्पादित करु शकलो तर शेतकऱ्यांना आधिक उत्पन्न मिळु शकेल.उत्पादन आधिक्यातुन विक्रीत वाढावा व विक्रीयोग्य वाढावा निर्माण होईल. यातुनच शेतमाल निर्यात वृद्धीला चालना मिळू शकते. आपण जर विषमुक्त अन्न ही जागतीक मागणी पुर्ण करु शकलो तर आपणाला या आंतरराष्ट्रीय व्यापारातुन मोठ्या प्रमाणात परकिय चलन मिळेल.

सध्या भारताच्या GDP मध्ये उत्पादित दुधाचे मुल्य हे गहु व तांदुळाच्या एकत्रीत मुल्यापेक्षा ३७ टक्के पेक्षा आधिक आहे. १९८०-८१ ते २०१६-२०१७ या कालावधी मध्ये भारताच्या घरगुती राष्ट्रीय उत्पादनात शेतीक्षेत्राचा वाटा ३४ टक्क्यापासुन १७ टक्क्यापर्यंत कमी झाला आहे. परंतु याच कालावधीचा अभ्यास करता असे दिसुन येते की, पशुधन क्षेत्राचा भारताच्या घरगुती राष्ट्रीय उत्पादनातील वाटा १४ टक्क्यापासुन २७ टक्क्यापर्यंत वाढला आहे. याचा अर्थ पशुधन क्षेत्रामध्ये शेती व शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याची खुप मोठी क्षमता आहे. विशेषतः भारतामधील एकुण पशुधनापैकी जवळपास ७१ टक्के पेक्षा आधिक पशु हे सीमांत शेतक आधिक पशु हे सीमांत शेतकऱ्यांकडे आहे.

या कार्यक्रमाअंतर्गत दुध उत्पादन - उत्पादकता वाढीला प्राधान्यक्रम दिला जाणार आहे. २०१५-२०१६ मधील १५५.४८ मिलियन टन दुध उत्पादन २०२०-२१ मध्ये २७५.८७ मिलियन टन २०२३-२०२४ मध्ये ३०० मिलियन टन एवढे दुध उत्पादनातील वाढीचे उद्दिष्टये या कार्यक्रमाअंतर्गत ठेवले आहे. तसेच प्रति पशुची दरडोई दुधउत्पादकता ४.८५ किलोग्राम वरुन ६.७७ किलोग्राम पर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. मागील दोन वर्षातील दुध उत्पादकतेमधील सरासरी वाढ ६ टक्के पेक्षा आधिक आहे. यावरुन वरील उद्दिष्टांची पुर्ती होणे शक्य आहे. याचा सर्वाधिक सकारात्मक परिणाम सीमांत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुपट्टीपेक्षा आधिक होईल. ही समाधानाची बाब आहे.

भारतीय शेती श्रमप्रधान असुन छुपीबेकारी या क्षेत्रात सर्वाधीक आहे. भारतामध्ये सीमांत व कोरडवाहु शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधीक आहे. भारतीय शेती हंगामी स्वरुपाची आहे. शेतकऱ्यांना वर्षात दोन ते तीन वेळाच उत्पन्न मिळते. त्यामुळे वर्षभर आपल्या उपभोग व शेतीखर्चासाठी त्याला सावकार व बॅंक कर्जावर अवलंबुन राहावे लागते. तसेच शेती उत्पन्नातील सततच्या अनिश्चिततेमुळे भारतीय शेतकरी कर्जबाजारी बनला आहे. समाज व आपल्या व्यवसायात पतहिन झाला आहे. यावरील एक उपाय म्हणुन या कार्यक्रमाकडे पाहणे आवश्यक आहे. दुधउत्पादनातुन शेतकऱ्यांना दररोज वर्षभर शाश्वत उत्पन्न मिळू शकते. दुध उत्पन्नातुन शेतकरी आपला दरडोई उपभोग खर्च पुर्ण करतो. तसेच शेतीसाठीचा लागणारा चालु खर्च पुर्ण करुन उर्वरित बचतीतुन भांडवली खर्च, विविध साधन सामग्री खरेदी करण्याची क्षमता त्याच्यामध्ये येऊ शकते. यातुन शेतकऱ्यांची बाजारात समाजात पत वाढेल. त्याला कर्ज उपलब्ध होईल.एकुणच राष्ट्रीय गोकुळ मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढुन त्यांचा उपभोग खर्च वाढुन राहणीमानात सुधारणा होईल.यातुनच ग्रामिण दारिद्र्याचे प्रमाण कमी होईल.

थोडक्यात, पशुधनक्षेत्र ग्रामिण अर्थव्यवस्थेचे एक महत्वाचे उत्पादक क्षेत्र आहे.पशु ही भारतीय समाजाची सर्वात जुनी संपत्ती आहे. पशु हे ग्रामिण समाजामध्ये आर्थिक संपन्नतेचे द्योतक मानले जाते. ग्रामिण

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

विकासामध्ये पशुधनाचे महत्त्व पुर्वीपासुनच राहत आले आहे. ग्रामिण अर्थव्यवस्थेचा संतुलित विकास, विशेषतः अल्प उत्पन्न गटातील ग्रामीण लोकांचे उत्पन्न वाढुन ते विकासाच्या मुख्य प्रवाहात येतील.शेतीमध्ये गुंतवणूक परतावा कमी आहे.परंतु तुलनेने पशुधन क्षेत्रामध्ये गुंतवणूक आधिक्य आहे.एका अभ्यासानुसार, शेती क्षेत्रात एक डॉलर गुंतवणूक केल्यास ३.६ डॉलर उत्पन्न मिळत असेल तर पशुधन क्षेत्रात ४.७ डॉलर उत्पन्न वाढ मिळते. म्हणजेच तुलणात्मदृष्ट्या पशुधन क्षेत्रात गुंतवणूक परतावा अधिक आहे.

**निष्कर्ष-**

१. पशुधन क्षेत्र केवळ उपजिविकेचे साधन नसुन त्यातुन सुनिश्चित अन्नसुरक्षा,उर्जा मिळण्याचे क्षेत्र आहे. ग्रामिण समाजाच्या विकासाचे ते प्रतिक आहे.
२. आजही जवळपास ७० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष- अप्रत्यक्षरित्या शेती क्षेत्रावर अवलंबुन आहे. म्हणून पशुधन क्षेत्राच्या विकासाला बहु-आयामी भूमिकेतुन पाहणे आवश्यक आहे.
३. आज विषमुक्त अन्न ही जागतीक मागणी व गरज आहे. भारतात कोरडवाहु शेतीचे प्रमाण लक्षात घेता सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यातुन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजे. अर्थात सेंद्रीय दुध, सेंद्रीय खत, बायोगॅस इत्यादी उपउत्पादने तयार करुन त्यांच्या विक्रीतुन शेती उत्पन्न वाढेल. शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल खेडी स्वयंपुर्ण व परिपुर्ण होतील.
४. ग्रामिण अर्थव्यवस्थेमध्ये श्रमशक्ती विपुल प्रमाणात आहे. तसेच भारतात सीमांत शेतकरी, कोरडवाहु शेतकऱ्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे.वर्षभर सतत रोजगाराची शाश्वती नसल्यामुळे त्यांच्या उत्पन्नावर प्रतिकुल परिणाम होतो.दुग्ध व्यवसायामुळे शेतकऱ्यांकडील संसाधनाचा पर्याप्त वापर वाढतो. महत्त्वाचे म्हणजे स्वयंरोजगार निर्माण होतो. अकुशल व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो.शेती क्षेत्रातील छुपी बेकारी कमी होण्यास मदत होईल.
५. पशुधन क्षेत्रामध्ये स्त्री-पुरुष समानता आहे. भारतामध्ये या क्षेत्रात जवळपास ७० टक्के महिलांचा सहभाग आहे. अर्थात पशुधन क्षेत्राच्या विकासातुन महिलांचे आर्थिक,सामाजिक व कौटुंबिक सबलीकरण होईल.

थोडक्यात राष्ट्रीय गोकुळ मिशन हा कार्यक्रम बहुआयामी दृष्टीकोण असलेले ग्रामीण विकासाचे प्रारुप आहे.अर्थात आज गोरक्षणाच्या नावाखाली काहीजन कायदा हातात घेत आहे. समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण करत आहे.खाजगी गोरक्षकांचा उन्माद दिसुन येत आहे ही चांगली बाब नाही.हा कार्यक्रम ग्रामविकासासाठी आहे ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे.गोरक्षकांना रोखण्यासाठी सरकारने कठोर पाऊले उचलायला हवीत, तसेच असामाजिक घटक कायदा हातात घेणार नाहीत. याबाबत दक्ष असायला हवे.

**संदर्भसुची-**

१) पशुपालन, डेअरी और मत्स्यपालन विभाग, भारत सरकार.
२) कृषि और किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार.
३) Economic Survey, 2017-18.
४) Ministry of Finance Department, Government of India.
५) Agriculture Co-operation & Farmers Welfare Government of India.
६) १९ वी पशुगणना २०१२, भारत सरकार.

❑❑❑